Volume-7 (2026)
Special Issue-2 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# "ग्रामीण स्त्री जीवनाची व्यथा उलगडणारी कादंबरी राशाटेक"

**प्रा. कु. सारिका आर. राऊत**
महात्मा फुले महाविद्यालय व
सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड
मो.नं. 9511877262
ईमेल – sarikaraut636@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.139

---

डॉ. प्रतिमा इंगोले ह्या विदर्भ कन्या असून ग्रामीण साहित्यात एक उत्तुंग व्यक्तीमत्व असलेले नाव आहे. त्या स्वत: एका छोट्याशा खेड्यात जन्मल्या असून ग्रामीण जीवन, चालीरिती, रुढी, परंपरा, तसेच ग्रामीण स्त्रीची व्यथा, समाजाकडून, रक्ताच्या नात्यांकडून तिला मिळत असलेली वागणुक त्यांनी स्वत: उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे. माणसाच्या स्त्रीविषयक कल्पना, खुळ्या समजुती त्यांनी नेहमी त्यांच्या साहित्यातून समाजापुढे ठेवण्याचा अट्टहास केला आहे.

त्यांनी बहुविध साहित्य रचले आहे. त्यात प्रमुख्याने कांदबरी, ललितलेखसंग्रह, वैचारिक लेखसंग्रह, कथा-संग्रह, काव्यसंग्रह तसेच संदर्भ ग्रंथाचे लेखन केले आहे. त्यांच्या कादंबरी वाङ्:मयात बुढाई, पार्टटाईम, बोडखी, आत्मधाताचे दशक, नक्षलग्रस्त, लळीताचे रंग, तसेच राशाटेक या कांदबऱ्या आपणास पहावयास मिळतात.

ग्रामीण स्त्री बालपणी कितीही सुखात वाढली. तिचे बालपण आनंदात, हसत-खेळत, दुखाची झळ न लागता गेले तरीही लग्न झाल्यावर ती आपल्या माहेरला कशी पारखी होते. रक्ताचे हाडामासाचे नाते कसे परके होते या मनातील व्यथा डॉ. प्रतिमा इंगोले यानी समाजापुढे मांडण्यासाठीच राशाटेक ही कांदबरी लिहीली.

मी समिक्षात्मक लेख लिहीण्यासाठी राशाटेक ही कादंबरी निवडली त्यामागचा हेतू आज आपण 2025 या शतकात वावरत आहोत परंतु समाजातील स्त्रीविषयक कल्पनेत फार मोठा बदल झाला असे पहावयास मिळत नाही. दोन मुली झाल्यानंतर तिसऱ्यांदा मुलाची वाट पाहणारे दाम्पत्य आपण आजही उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. आज मुली मुलांच्या तुलनेत कुठेच कमी नाही तरीही वंशाचा दिवा मुलगा यासाठी नवससायस करणारे लोक समाजात पहावयास मिळतात. लग्न झाल्यावर वडीलोपार्जित संपत्तीत समान वाटा म्हणुन कायदा होवूनही मुलगी तिच्या घरी सुखी आहे. कमीअधिक तिच्या जीवनात असेल तर ते तिचे नशीब म्हणणारे आई वडील आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो. बहीनीला वाटा द्यावा लागेल म्हणुन वडील वारल्यावर आधार्ड कार्ड मागून सर्व संपत्ती स्वत:हाच्या नावार करणारे भाऊ आजही समाजात आहेत म्हणुन राशाटेक मधील व्दारका सारखी परिस्थिती आज कोणत्याही मुलीवर आली तर अशीच वागणुक मिळणार काय? किंबहुना कीत्येकींना ती मिळत आहे. असे प्रत्येक स्त्रिला कमी अधिक प्रमाणात वाटणे साहजीकच आहे. एक स्त्री या नात्याने राशाटेक मधली

व्दारका मला फार जवळची, मैत्रीण वाटली म्हणुन मी हा लेख लिहीण्यासाठी राशाटेक कादंबरीची निवड केली.

राशाटेक ही कादंबरी एका ग्रामीण स्त्रीवरच आधारलेली आहे व्दारका नावाची स्त्रीपात्र डॉ. प्रतिमा इंगोले यांनी रेखाटले आहे. राशाटेक हे एक टेकडीचे नाव आहे राशाटेक व व्दारका ह्या दोन्ही आपले अस्तीत्व टिकवून नाशीबाशी झगडून जीवन जगत आहे ज्या-प्रमाणे व्दारका हे पात्र नात्याच्या गुंतावळीत खुळी आशा बाळगुन जगत आहे. सकाळपासुन रात्रीपर्यंत कष्ट करुन स्वबळावर जीवन जगणारी व्दारका आपणास या कादंबरीत पहावयास मिळते. ती नातेवाईकांची व नवऱ्याची आशा करीत नाही.

“पहिली बेटी तुप रोटी” म्हणणारे आई बाप, भाऊ लग्न झाल्यावर मात्र मुलीला परके कसे काय समजतात याचे फार दु:ख वाटते. व्दारकाला चार भाऊ असून तीच्या खडतर जीवनात तिला कोणीच साथ देत नाही. व्दारका ऐवजी जर पाचवा भाऊ असता तर त्याचा वडीलांचा संपत्तीत सारखाच वाटा पडला असता पण व्दारका मुलगी असल्याने “तुझ नशीब आणि तु” म्हणणारे भाऊ व सगेसोयरे यांच्या रक्ताचे नाते का दुभंगते हे मला कळत नाही. लहानपणी लाडात वाढलेली व्दारका लग्नानंतर खडतर जीवन जगतांना आपणास पाहवयास मिळते. व्यसनी बाई-बाटलीचा नाद असलेला तिचा नवरा, स्वत:च्या संसारात खुष असलेले तिचे चार भाऊ, मुलाचा संसार सुरळीत होईल व त्याला घराची ओढ लागेल म्हणून वाट पाहणारा व्दारकाचा सासरा, व्दारकाबद्दल थोडी आस्था असणारी व तिला वेळोवेळी मदत करणारी तिची मोठी जाऊ या सर्व कथानकासह ही कथा लेखिकेने राशटेक या कादंबरीत मांडली आहे.

राशाटेक नावाची टेकडी व त्याबद्दलची दंतकथा डॉ. प्रतिमा इंगोले यांनी या कादंबरीत मांडली आहे धान्याची रास जळून भस्म झाल्याने त्या टेकीचे नाव ‘राशाटेक’ पडले आहे. ग्रामीण शेतकरी, मजुरवर्ग यांच्या जीवनाचे चित्र त्यांनी त्यात साकारले आहे. ग्रामीण भागात गरीबी असूनही मनाचा मोठेपणा, आपुलकी, जिव्हाळा, आपणास पहावयास मिळतो नवऱ्याच्या आधार नसतांना व्दारकाच्या बाळंपतपणात तिच्या मैत्रीणी धावून आलेल्या दिसतात व आता मुलगी झाली म्हणुन तरी आपल्या मुलाचे लक्ष संसारात लागेल म्हणून खोटी अशा उराशी बाळगणारा तिचा सासरा याला व्दारकाबद्दल आपुलकी, जिव्हाळा पहावयास मिळातो. व्दारका व तिची लहान मुलगी यांच्या हालअपेष्टा पाहुन जीव कासाविस होतो. परंतु व्दारकाच्या मोहरच्या मंडळींना त्याचे काहीच वाटत नाही. कठीण परिस्थितीतही हलबल न होता खंबिरपणे स्वत:च्या प्रारंबध्दाशी झगझणारी व्दारका मनाला उभारी देवून जाते.

राशाटेक टेकडी व व्दारका संकटांना न घाबरता आलेल्या परिस्थितीवर मात करुन जीवन जगताना पहावयास मिळतात. राशाटेक या टेकडीला राशाटेक हे नाव का पडले याविषयी एक दंतकथा आहे. एकेकाळी संघन असलेली बहीन नियतीच्या घाल्यान तिला वाईट दिवस आले ऐवढे वाईट की दोन वेळचे जेवणनही मिळत नव्हते. मुल उपाशी राहुन लागली काहीही करता उपाय चालत नव्हता ती नवऱ्याला म्हणायची अहो माझा भाऊ सदन आहे माझ्या वडीलांचेही भरपुर पैसे त्यांच्याजवळ जमा आहे. मी जाते काहीतरी मदत मागते पण नवरा म्हणायचा अव वाईट वेळ आल्यावर कोणी मदत करत नाही तु जावु नको पण बहीणीला मोठा अभिमान व विश्वास की मया भाऊ मले मदत केल्या बिगर राहणार नाही पाहाच तुमी अव आपलं सोडा लेकराईकडे पहा

म्हणुन एक दिवस सकाळीसच माहेरच्या वाटेन लागली. भराभर पावल टाकत बापाच्या घरी आल्यावरच दम खाल्ला वहीनी घरी होती ननंदेला पाहून म्हणाली पाय धुवा पण इन एकच प्रश्न केला भाऊ कुठाय भावजय म्हणाली, शेतात तशीच शेतात जायला निघाली भावजय म्हणाली अव पाणी प्या, काहीतरी खावा मग जा भावाच्या भेटीले पण नजरेपुढे मुलांचे उपाशी पोट दिसत होते. तशीच शेतात गेली भाऊ ज्वारीच्या धान्याच्या टेकडीऐवढ्या राशीजवळ बसला होता. बहीनीला पाहिल्याबरोबर त्याचा चेहरा उतरला ही नक्कीच मागायला आली हे त्यान ओळखल कारण बहीनीची परिस्थिती त्याला माहिती होती बहीन भावला म्हणाली लेकर उपाशी हाय काहीतरी मदत कर भाऊ म्हणाला हे त्यांचा बापले नाही दिसत काय? दिसते पण उपाय नाही. दादा तस नाही तर उसनी ज्वारी तरी दे आल्यावर परत करीन पण कठोर ह्दयच्या भावाला बहीनीची क्युव आली नाही आल्यापावली जायला निघाली मनात ईचार धान्याची टेकडीऐवढी रास पण काय कामाची जो दाना भुकलेल्याची भुक भागवत नाही तो दाना ती रास मायासाठी मातीमोल आहे. शिवाय नवऱ्याला घरी गेल्यावर काय सांगु आयुष्यभर तोही टोमने मारणार लेकराच उपाशी पोट, लेकराचे हाल तिला सहन झाले नाही व कोनच्या तोंडान घरी जावू म्हणून धान्याची टेकडीऐवढी रास मायासाठी मातीमोल आहे म्हणुन रस्त्यातच जीवन संपवते.

बहीनीच्या कासावीस झालेल्या मनामुळे इकडे भावची ज्वारीची रास माती होते व मातीची टेकडी बनते ‘अराशाटेक’ म्हणुन त्या टेकडीला नाव पडते राशाटेक भाऊ कपाळावर हात ठेवतो हे काय झाले म्हणून पण वेळ निघून गेलेली असते.

एकाच उदरातून जन्म घेतलेले भाऊ आणि बहीन पण भावाला बहीनीची मदत काराविशी वाटत नाही उसनी तर सोड पण मी तुले एक दानासुध्दा देणार नाही अस म्हणारा भाऊ आपणास कादंबरीतच नव्हे तर आजही समाजात पाहवयास मिळतो.

समाजात अशी वागणूक मिळणाऱ्या कमीअधिक प्रमाणात सगळ्याच स्त्रीया आहे व्दारकाही त्याला अपवाद नाही समाजातील हे जीवंत चित्रण डॉ. प्रतिमा इंगोले यांनी या कादंबरीत मांडले ते मनाला भिडते. व्दारकाची आई साप चावून मरते तसेच माहेर तिला परके होते. व्यसनी नवरा व आपल्या संसरात रममान असणारे तिचे चार भाऊ व आपली समाजरचना ठरविणारे निदर्यी पुरुष यांचे हुबेहुब चित्रण या कांदबरीत लेखिकेने मांडले आहे व हे वास्तवादी चित्रण आजही समाजात आपणास पाहवयास मिळते. समाजातील पुरुषी व्यवहाराने जरी व्दारका नाडली गेली तरी राशाटेक ह्या टेकडीच्या दंतकथेने व्दारकेसारख्या बहीनीला न्याय मिळाल्याचे चित्र मनाला समाधान देते. मातीतून पिकणारे धान्य जर गरजु भूकेलेल्यांच्या तोंडी पडले नाही तर पिकूनच काय फायदा? एखाद्यावर अन्याय झाला असता तत्काल निसर्गाने न्याय करावा हेच सुत्र केंद्रस्थानी असलेली टेकडी म्हणजे राशाटेक! बहीनीचा हक्क नाकरल्याने धान्याच्या राशीची माती होऊन बनलेली ही टेकडी. माणासने आपले माणूसपण जानले नाही तर अनर्थ होतो. साचलेला पैसाही मातीमोलच असतो. एक दिवस सर्व सोडून मरनाच्या दारात जायचे आहे. स्वार्थी माणूस मोठ्या मनाने मदत न करुन सोबत काहीच येणार नाही हे माहित असून सुध्दा मानसाची हाव सुटत नाही. सर्व समजून उमजून स्वार्थाने बेभान झालेला माणूस कधी भानावर येईल की नाही कुणास ठावूक.

डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या बहुतेक साहित्य लेखणात ग्रामीण वऱ्हाडी बोलीभाषा, त्यातील निखंड वऱ्हाडी भाषेतील संवाद, म्हणी, वाकप्रचार, 'साप चावणे' याला पान लागलं म्हणने हे फार वेगळे वाटते त्यामुळे ही कादंबरी मोठ्या उंचीवर जावून पोहोचते. ग्रामीण भागातील खुळ्या समजुती, परंपरा, देवाला नवस करणे, साकडे घालणे व आपल्या इच्छापुर्तीची मागणी करणे, व्यसनाधिन नवऱ्याने बायकोला मारहान करणे, तिचा छळ करणे हे चित्रण त्यांच्या ग्रामीण भगातील वऱ्हाडी भाषेत मांडलेले असे बरेचसे प्रसंग डॉ. इंगोले यानी त्यांच्या कादंबरीतून मांडले आहे.

या कादंबरीतील संवाद निखड वऱ्हाडी भाषेतून असून प्रसंग मानाला भिडणारे आहे. या कादंबरीतून समाजात स्त्रीयांना मिळणारी वागणूक याचे प्रत्ययकारी चित्रण आपणास पाहवयास मिळते या कादंबरीतून सर्व स्त्रीयांची व्यथा समाजासमोर मांडण्याचा एक उद्देश आहे.

**निष्कर्ष :**

1) ग्रामीण भागातील स्त्रीयांना शब्दबध्द करणारी कादंबरी.
2) ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या व्यथा वेदना मांडणारी प्रतिनिधीक स्वरुपाची कादंबरी.
3) ग्रामीण स्त्रीची सुख:दुख मांडणारी कादंबरी.
4) ग्रामीण समाजजिवनातील कैंटूंबीक स्थिती उलगडण्याचा प्रयत्न
5) स्त्रीची भावाबद्दलची आशा मोडून सत्य जागासमोर उलगडणारी कादंबरी.
6) पुरुषप्रधान संस्कृतीचे दर्शन, नात्यातील दुरावा घडवणारी कादंबरी.
7) समाजातील सत्य जगापुढे मांडणारी कादंबरी.

**संदर्भग्रंथ :-**


- इंगोले, डॉ. प्रतिमा ; 'राशाटेक', प्रथमावृत्ती, 1 मे 2022.